10 AUG 2026 जनप्रवास

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यापीठात स्वातंत्र्यसैनिकांसह हुतात्म्यांना अभिवादन

## परिसरातील 'क्रांतिवन' येथे कार्यक्रम उत्साहात : स्मृतीस्तंभाला पुष्पचक्र अर्पण

**जनप्रवास : कोल्हापूर**

विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. राजनीश कामत आणि प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव यांनी क्रांतिवनातील स्मृतीस्तंभाला पुष्पचक्र अर्पण करून आदरांजली वाहिली. सर्व उपस्थितांनी कवी कुसुमाग्रज यांच्या 'अनाम वीरा...' या अजरामर देशभक्तीपर गीताचे सामूहिक वाचन केले.

डॉ. भारती पाटील यांनी याचे संयोजन केले. कुलगुरू डॉ. कामत यांनी देशसेवेसाठी सर्वस्वाचा त्याग करणाऱ्या स्वातंत्र्यसैनिकांच्या स्मृतींना उजाळा दिला. प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव यांनीही क्रांतीदिनाचे महत्त्व सांगत देशाच्या प्रगतीसाठी सर्वांनी योगदान देण्याचे आवाहन केले.



**शिवाजी विद्यापीठात क्रांती दिनानिमित्त क्रांतिवनातील स्मारकाला पुष्पचक्र वाहून अभिवादनप्रसंगी कुलगुरू डॉ. राजनीश कामत, प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव. सोबत कुलसचिव डॉ. विलास शिंदे, डॉ. भारती पाटील, डॉ. सावलीराम घाणे आदी.**

यावेळी कुलसचिव डॉ. विलास शिंदे, विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. सावलीराम घाणे, डॉ. शशीभूषण महाडिक, डॉ. सोमनाथ पवार, डॉ. आलोक जत्राटकर, डॉ. संजय चोपडे, सुरक्षा अधिकारी वसंत एकले, सुरेखा अडके यांच्यासह प्रशासकीय कर्मचारी उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

10 AUG 2026 तरूण भारत

# ध्येयवेडी माणसेच यशस्वी होतात

## कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांचे प्रतिपादन : घाळी कॉलेजमध्ये विद्यार्थ्यांचे स्वागत

**। त. भा. प्रतिनिधी**

**गडहिंग्लज :** विद्यार्थ्यांनी जे मिळाले आहे त्यावर समाधान मानाल तर प्रगती थांबेल त्यामुळे मिळालेल्या यशावर न थांबता पुढचे पाऊल टाकत रहा, ध्येयाप्रति वेडी असलेली व्यक्तिच यशस्वी होते असे मत शिवाजी विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी व्यक्त केले.

येथील डॉ. घाळी कॉलेजच्या वतीने पदवी व पदव्युत्तर स्तरावरील प्रथम वर्षात प्रवेशित विद्यार्थ्यांच्या स्वागत समारंभप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. अध्यक्षस्थानी संस्थेचे सहसचिव गजेंद्र बंदी होते. स्वगात प्राचार्य डॉ. दत्ता पाटील यांनी केले. यावेळी बोलताना कुलसचिव डॉ. शिंदे पूढे म्हणाले, अवघड आहे ते सहज करा, सहज ते सुंदर करा, सुंदर ते जतन करा आणि जे जतन केलय ते वापरायला शिका हेच यशस्वी होण्याचे तंत्र आहे. याचा वापर शैक्षणिक प्रथम वर्षापासून कराल तर तूम्ही खूप मोठ्या पदावर पोहचाल, असे सांगितले. डॉ. नागेश मासाळ यांनी प्रमुख पाहुण्यांचा परिचय करून दिला. यावेळी माजी विद्यार्थी डॉ. महेश चौगुले, प्रा. पी. डी. पाटील, कृष्णा माने, स्वप्नाली माने, मोनिका आरबोळे, उमेश आरबोळे यांचा विशेष सत्कार करण्यात आला.



**गडहिंग्लज : कार्यक्रमात मार्गदर्शन करताना कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे. शेजारी व्यासपीठावर इतर मान्यवर.**

सहसचिव सीए गजेंद्र बंदी यांनी मनोगत व्यक्त केले. सूत्रसंचालन प्रा. ओंकार खतकल्ले यांनी तर प्रा. सचिन जानवेकर यांनी आभार मानले. यावेळी यावेळी डॉ. निलेश शेळके, डॉ. मिलिंद पाटील, डॉ. शिवानंद मस्ती, डॉ. सरला आरबोळे, डॉ. सरोज बिडकर, डॉ. संदिप परीट, डॉ. दयानंद पाटील, प्रा.महेश वंडकर, डॉ. किरण पाटील, प्रा. म्हंकावे, प्रभाकर दुंडगे यांच्यासह विद्यार्थी उपस्थित होते.

10 AUG 2026 जनप्रवास

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# मास मीडियातून जनहिताला प्राधान्य द्या

## प्र- कुलगुरु डॉ. ज्योती जाधव : बीबीसी न्यूजला निवड झाल्याबद्दल साई सिमरनचा सत्कार

**जनप्रवास : कोल्हापूर**

समाजात मास मीडियाची भूमिका महत्त्वाची असून विविध माध्यमात नवनियुक्त झालेल्या विद्यार्थ्यांनी सामाजिक हिताला प्राधान्य द्यावे, असे आवाहन शिवाजी विद्यापीठाच्या प्र-कुलगुरू प्रा. डॉ. ज्योती जाधव यांनी केले.

मास कम्युनिकेशन विभागाच्या वतीने नुकत्याच विविध माध्यमातून जॉईन झालेल्या विद्यार्थ्यांच्या गौरव सोहळा आयोजित करण्यात आला होता. याप्रसंगी त्या बोलत होत्या.

डॉ. जाधव म्हणाल्या, बीबीसी न्यूज मराठीला निवड झाल्याबद्दल साई सिमरन घाशी या विद्यार्थिनीचा प्रा. डॉ. ज्योती जाधव यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. गेल्या तीन वर्षात मास कम्युनिकेशन विभागाचे तीसहून अधिक विद्यार्थी स्थानिक पातळीपासून राष्ट्रीय पातळीवरच्या माध्यमात जॉईन झाले आहेत. प्रास्ताविक मास कम्युनिकेशनचे समन्वयक डॉ. शिवाजी जाधव यांनी केले. यावेळी सुमेधा साळुंखे, जयप्रकाश पाटील, विद्यार्थी उपस्थित होते.



**नवी दिल्ली : येथे बीबीसी न्यूज मराठीला निवड झाल्याबद्दल माजी विद्यार्थिनी साई सिमरन घाशीचा सत्कार करताना डॉ. ज्योती जाधव. सोबत मास कम्युनिकेशनचे समन्वयक डॉ. शिवाजी जाधव, डॉ. सुमेधा साळुंखे आदी.**

10 AUG 2026 तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# मास मीडियातून जनहिताला प्राधान्य द्या

- प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव यांचे प्रतिपादन

त. भा. प्रतिनिधी

कोल्हापूर : समाजात मास मीडियाची भूमिका महत्त्वाची असून विविध माध्यमात नवनियुक्त झालेल्या विद्यार्थ्यांनी सामाजिक हिताला प्राधान्य द्यावे, असे आवाहन शिवाजी विद्यापीठाच्या प्र- कुलगुरू प्रा. डॉ. ज्योती जाधव यांनी केले.

मास कम्युनिकेशन विभागाच्या वतीने नुकत्याच विविध माध्यमातून जॉईन झालेल्या विद्यार्थ्यांचा गौरव सोहळा आयोजित करण्यात आला होता. यावेळी त्या बोलत होत्या.

गेल्या तीन वर्षात मास कम्युनिकेशन विभागाचे तीसहून अधिक विद्यार्थी स्थानिक पातळीपासून राष्ट्रीय पातळीवरच्या माध्यमात कार्यरत झाले आहेत. या विद्यार्थ्यांचा मास कम्युनिकेशन विभागाच्या वतीने गौरव करण्यात आला.



कोल्हापूर : मास कम्युनिकेशनच्या विद्यार्थ्यांचा सत्कार करताना प्रा. डॉ. ज्योती जाधव. सोबत समन्वयक डॉ. शिवाजी जाधव, डॉ. सुमेधा साळुंखे, जयप्रकाश पाटील आदी.

प्रास्ताविक मास कम्युनिकेशनचे समन्वयक डॉ. शिवाजी जाधव यांनी केले. यावेळी सुमेधा साळुंखे, जयप्रकाश पाटील यांच्यासह विद्यार्थी उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
10 AUG 2026 जनप्रवास शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# एआय ज्ञाननिर्मितीचे नव्हे माहितीचे साधन : डॉ. ज्ञानेश्वर गटकर

**जनप्रवास : कोल्हापूर**

कृत्रिम बुद्धिमत्ता (ए. आय.) हे ज्ञान मिळवण्याचे किंवा ज्ञानाच्या निर्मितीचे साधन नसून ते केवळ माहिती देऊन आपल्याला मदत करणारे एक साधन आहे. संशोधक म्हणून ज्ञानाची नवनिर्मिती ही मानवी बुद्धिलाच करावी लागणार आहे, असे प्रतिपादन यवतमाळ येथील लोकनायक बापूजी अणे महिला महाविद्यालयाचे डॉ. ज्ञानेश्वर गटकर यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाच्या राज्यशास्त्र अधिविभागाच्या वतीने आयोजित 'संशोधनामध्ये ए.आय.चा वापर' या विषयावरील कार्यशाळेत प्रमुख मार्गदर्शक म्हणून ते बोलत होते. अध्यक्षस्थानी अधिविभाग प्रमुख डॉ. प्रकाश पवार होते.

डॉ. गटकर म्हणाले, ए. आय. कडे कितीही सृजनशीलता असली तरी ती विवेकी असेलच, असे नाही. ए.आय. स्वयंचलित वाटत असले तरी माणसाची बुद्धी त्याला जशी आज्ञा (प्रॉम्प्ट) देईल, त्यानुसारच ते कृती करते. कृत्रिम बुद्धिमत्तेवर काम करण्यापूर्वी आपण मानवी चुका आणि अज्ञानावर मात केली पाहिजे. 'ट्युरिंग टेस्ट' आणि अलान ट्युरिंग यांच्या संकल्पनेपासून सुरू झालेला ए. आय. चा प्रवास 'चॅट-जीपीटी',



'जेमिनी', 'क्लॉड' आणि विविध ए.आय. एजंट्सपर्यंत कसा पोहोचला, याची माहिती दिली. शोधनिबंधांचे विश्लेषण, डेटा क्लीनिंग, संदर्भ शोधणे यासाठी आधुनिक टूल्सचा वापर कसा करावा, याविषयीही मार्गदर्शन केले.

अध्यक्षस्थानावरून डॉ. प्रकाश पवार म्हणाले, तंत्रज्ञान वेगाने वाढत आहे. सध्याची पिढी टेक्नोसेव्ही आहे. संशोधक विद्यार्थ्यांनी ए.आय. सारख्या तंत्रज्ञानाची मदत घ्यावी. संशोधन योग्य दिशेला घेऊन जाण्यासाठी तंत्रज्ञानाचा विवेकी वापर होणे गरजेचे आहे. विद्यार्थ्यांनी संशोधनात हे तंत्रज्ञान साह्य घेत असताना संशोधन पद्धतीची चौकट मोडता कामा नये. डॉ. सुखदेव उंदरे यांनी प्रास्ताविक केले. डॉ. दत्तात्रय सावंत यांनी परिचय करून दिला. कार्यशाळेला राज्यशास्त्र, समाजशास्त्र विभागातील प्राध्यापक, संशोधक विद्यार्थी आणि पदव्युत्तर वर्गाचे विद्यार्थी उपस्थित होते.